ग्रंथमालिका ‘आचारधर्म’ : सात्त्विक अलंकार – खंड ५

# कंठापासून कमरेपर्यंत घालायचे अलंकार

## अलंकारांविषयीचे शास्त्र अन् सूक्ष्मातील प्रयोग !

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सौ. रंजना गौतम गडेकर आणि अन्य**






**सनातन संस्था**


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ 'भारत गौरव पुरस्कार' देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थलकालाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले

१५.५.१९९६

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्यांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



सौ. रंजना गौतम गडेकर

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मंगळसूत्र (सौभाग्यालंकार) | ११ |
| २. | हार | २९ |
| ३. | साखळी | ४१ |
| ४. | मोत्यांची माळ | ४२ |
| ५. | गळ्यात घालावयाचे इतर अलंकार | ४४ |
| ६. | कटीसूत्र (कमरपट्टा) | ४४ |
| ७. | मेखला | ४९ |
| ८. | छल्ला | ५४ |
| ९. | आचारधर्मानुसार अलंकार त्या त्या स्थानीच घालण्यामागील महत्त्व विशद करणारे सूक्ष्मातील प्रयोग | ६२ |

१०. अलंकारांशी संबंधित देवता, देवतेचा कार्यरत होणारा भाव, अलंकार परिधान करणाऱ्यातील आणि पहाणाऱ्यातील भाव ७४

११. आध्यात्मिक त्रास असणारे आणि नसणारे जीव यांना अलंकार परिधान केल्यामुळे तारक अन् मारक स्तरांवर होणारा लाभ ७५

१२. विविध अलंकारांमुळे जिवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रमाण ७५

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७६

---

**टीप** – ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाध्यांनी संबोधले जात आहे. त्यामुळे त्यापूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावाच्या आरंभी ‘श्रीसत्‌शक्ति’ किंवा ‘श्रीचित्‌शक्ति’ ही उपाधी लावलेली नाही. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## मनोगत

स्त्रीने मंगळसूत्र घातले की, तिला पातिव्रत्याचे सतत स्मरण राहून तिचा मातृभाव जागृत रहातो. ठुशी, लक्ष्मीहार यांसारख्या अलंकारांमध्ये स्त्रीलावण्य अधिक खुलून उठते. हिंदु संस्कृतीचे भूषण असलेले अलंकार न केवळ स्त्रीची शोभा वाढवतात, तर तिला आचारधर्मपालनाची उत्तम संधीही प्राप्त करून देतात. सध्याच्या कलियुगात व्यक्तीच्या सात्त्विकतेची पातळी घसरत असतांना हिंदु धर्मातील आचारपालनामुळे ती टिकवून ठेवणे सहज शक्य होते. मुळातच स्त्री पुरुषांपेक्षा अधिक भावनाशील असल्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांना वाईट शक्तींचा त्रास होण्याची शक्यता अधिक असते. यासाठी हिंदु धर्माने पुरुषांपेक्षा स्त्रियांना अधिक अलंकार प्रदान करून त्या माध्यमातून स्त्रियांचे वाईट शक्तींपासून रक्षण होण्याचा मार्ग सांगितला आहे. स्त्रियांनी विविध अलंकार धारण करण्याचे महत्त्व प्रस्तूत ग्रंथात केलेल्या शास्त्रीय विवेचनातून कळेल.

विविध अलंकार धारण केल्यावर ईश्वरी तत्त्व कसे ग्रहण होते, व्यक्तीचा आध्यात्मिक त्रास कसा न्यून (कमी) होतो इत्यादींविषयीची सूक्ष्म-स्तरावरील प्रक्रिया उलगडणाऱ्या सूक्ष्म-ज्ञानविषयक प्रयोगांचा अंतर्भावही ग्रंथात केला आहे. एखादी गोष्ट नुसती सांगण्यापेक्षा प्रयोगाद्वारे सिद्ध झाली, तर आपला लगेच त्या गोष्टीवर विश्वास बसतो. अलंकारविषयक प्रयोगांतून काढलेले निष्कर्ष हे अलंकारविषयक शास्त्रीय विवेचनाशी सुसंगतच ठरले आहेत. त्यामुळे साहजिकच अलंकारशास्त्राविषयी श्रद्धा वाढायला साहाय्य होते. या सूक्ष्म-ज्ञानविषयक प्रयोगांचे विवेचन करतांना आरंभीला आम्ही त्या त्या अलंकाराचे छायाचित्र दिले आहे. वाचकांनी त्या छायाचित्राकडे पाहून प्रयोग स्वतः करायचा प्रयत्न करावा, म्हणजे छायाचित्राकडे पाहून चांगले कि त्रासदायक वाटते अथवा एखादी अनुभूती इत्यादी येते का, ते पहावे आणि त्यानंतरच पुढील भाग वाचावा. यामुळे वाचकांचा सूक्ष्मातील अभ्यास होऊन अलंकार विकत घेतांना 'तो सात्त्विक कि तामसिक आहे',

हे ओळखता येण्यास साहाय्य होईल.

या ग्रंथाच्या वाचनाने अलंकारधारणाचे महत्त्व लक्षात येऊन अलंकाररूपी अमूल्य ठेवा देणाऱ्या हिंदु धर्माची महानताही लक्षात यावी, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## अलंकारांची आध्यात्मिकदृष्ट्या शुद्धी करण्याचे महत्त्व

अलंकार परिधान करण्यामागे सौंदर्यवृद्धीपेक्षा आध्यात्मिक लाभ हा उद्देश अधिक महत्त्वाचा आहे. अलंकार परिधान केल्याने वाईट शक्तींपासून रक्षण होते. सोने-चांदीच्या सात्त्विकतेमुळे हा परिणाम साधला जातो. यामुळेच वाईट शक्ती अलंकारांना विरोध करतात आणि त्यांच्यावर काळे आवरण आणतात. हे सूक्ष्मातून घडत असल्याने ते सामान्यांना डोळ्यांनी दिसत नाही आणि 'अलंकार स्वच्छ आहेत', असे वाटते; पण प्रत्यक्षात तसे नसते. त्यामुळे अलंकार नियमितपणे स्थूल आणि सूक्ष्म दृष्ट्या (आध्यात्मिकदृष्ट्या) स्वच्छ करणे गरजेचे आहे. अलंकार रिठ्याने (स्थुलातून) स्वच्छ करतांना त्यांवरील काळे आवरण जाण्यासाठी प्रार्थना करावी अन् त्यांना विभूती लावून ते धुवावेत. वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांनी अलंकार प्रत्येक आठवड्याला अशा पद्धतीने स्वच्छ करावेत आणि नसलेल्यांनी ते प्रत्येक महिन्याला स्वच्छ करावेत. **(संदर्भ : सनातनचा ग्रंथ 'अलंकारांचे महत्त्व')**

**अलंकारांविषयी स्त्रियांना योग्य दृष्टीकोन सांगणारे सनातनचे ग्रंथ !**

- **हाता-पायांत घालायचे अलंकार**
- **बिंदीपासून कर्णभूषणांपर्यंतचे अलंकार**

